**ठळक बातम्या**

- राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय नेतेपदी नरेंद्र मोदी यांची निवड, रविवारी संध्याकाळी राष्ट्रपती भवनात प्रधानमंत्री म्हणून शपथविधी

- रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढाव्यात व्याजदर जैसे-थे, चालू आर्थिक वर्षासाठी विकास दराचा अंदाज वाढवून ७ पूर्णांक २ दशांश टक्के

- लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या दिवशी झालेल्या घसरगुंडीची शेअर बाजारातून भरपाई, सेन्सेक्स आणि निफ्टी विक्रमी पातळीवर

**आणि**

- दक्षिण आफ्रिकेत सर्व पक्षांचं मिळून राष्ट्रीय सरकार स्थापन होणार

**<><><><><>**

भाजपचे ज्येष्ठ नेते, नरेंद्र मोदी येत्या रविवारी, ९ जून रोजी सलग तिसऱ्यांदा प्रधानमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू नरेंद्र मोदी यांना आणि त्यांच्या नवीन मंत्रिमंडळाला शपथ देतील. राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ही माहिती दिली.

**होल्ड - प्रधानमंत्री**

**<><><><><>**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला दिलेल्या राज्यघटनेतली मूल्यं जपण्यासाठी आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण समर्पित असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. गरीब परिस्थितीत आणि मागासलेल्या कुटुंबात जन्मलेल्या आपल्यासारख्या व्यक्तीला देशाची सेवा करण्याची संधी

मिळाली, ती फक्त राज्यघटनेमुळेच, असं मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात नमूद केलं आहे. भारताची राज्यघटना कोट्यवधी नागरिकांना आशा, ताकद आणि प्रतिष्ठा देते, असंही त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाचे नेते म्हणून नरेंद्र मोदी यांची आज निवड झाली. रालोआच्या नवनिर्वाचित खासदारांची बैठक आज नवी दिल्लीत संसद भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात झाली. संरक्षण मंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते राजनाथ सिंग यांनी नरेंद्र मोदी यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. मोदी यांच्या नेतृत्वात भारताने विलक्षण प्रगती केली असून यापुढेही ही वाटचाल यशस्वी होण्याकरता नरेंद्र मोदी ह्यांचंच नेतृत्व योग्य राहील असं ते म्हणाले. अमित शहा, नितीन गडकरी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह देशभरातल्या विविध नेत्यांनी या प्रस्तावाला अनुमोदन दिलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या नेतेपदी निवड झाल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी आणि मुरली मनोहर जोशी यांची भेट घेऊन त्यांचा आशीर्वाद घेतला. प्रधानमंत्र्यांनी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचीही त्यांच्या नवी दिल्ली इथल्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली.

**<><><><><>**

दिल्लीत संसद भवन परिसरातले छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे हलवण्याचा काँग्रेसनं विरोध केला आहे.

हे पुतळे संसद भवन परिसरातून बाहेर नेले जात नसून त्याच परिसरात अन्यत्र अधिक सुसंगतपणे ठेवण्यात येत आहेत, असं स्पष्टीकरण लोकसभा सचिवालयानं दिलं आहे.

<><><><><>

नीट प्रवेश परीक्षेत झालेल्या कथित अनियमित व्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी व्हावी अशी मागणी  काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली ही चौकशी व्हावी अशी मागणी करत त्यांनी अशा प्रवेश परीक्षांमधल्या अनियमिततेला सरकार जबाबदार असल्याचं आपल्या संदेशात म्हटलं  आहे.

<><><><><>

भाजपाने दाखल केलेल्या मानहानी प्रकरणात काँग्रेस नेते राहुल गांधी यांना बंगळुरु विशेष न्यायालयाने आज जामीन मंजूर केला. काँग्रेसने  कर्नाटक विधानसभा निवडणुकीपूर्वी वृत्तपत्रांमधून दिलेल्या जाहिरातीत कर्नाटक राज्यसरकारने २०१९ ते २०२३ या काळात भ्रष्टाचार केल्याचा आरोप केला होता.

<><><><><>

पश्चिम बंगालच्या अनेक जिल्ह्यांमध्ये मतदानोत्तर हिंसाचाराच्या घटनांची नोंद झाली आहे. या घटनांमागे तृणमूल काँग्रेसचा हात असल्याचा भाजपाचा आरोप आहे, तर तृणमूल काँग्रेसनं हे आरोप फेटाळले आहेत.

<><><><><>

मणिपूरमधे जिरिबाम शहरात कायदा आणि सुव्यवस्था स्थिती बिघडल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यसरकारने काल रात्रीपासून संचारबंदी लागू केली आहे. हिंसाप्रवण भागातल्या रहिवाशांना सुरक्षा दलांनी सुरक्षित ठिकाणी हलवलं आहे.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं आज जाहीर केलेल्या द्वैमासिक पतधोरणाच्या आढाव्यात सलग आठव्यांदा व्याजदर जैसे-थे ठेवले. त्यामुळं कर्ज आणि ठेवींवरचे व्याजदर सध्यातरी बदलणार नाहीत. महागाईचा दर आणि विकास दरात समतोल साधला जात असल्याचं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी पतधोरण जाहीर करताना सांगितलं. यंदाचा मान्सून सामान्य राहील, या अपेक्षेनं वाढती महागाई आटोक्यात ठेवण्याचा पतधोरण समितीचा प्रयत्न राहील असंही ते म्हणाले.

चालू आर्थिक वर्षातल्या पहिल्या पतधोरणात रिझर्व्ह बँकेनं देशाचा विकास दर ७ टक्के राहील, असा अंदाज वर्तवला होता. त्यात यावेळी सुधारणा करुन आर्थिक विकास दर ७ पूर्णांक २ दशांश टक्के राहील, असा अंदाज व्यक्त केला आहे.

देशातल्या परकीय चलनाचे साठे ३१ मे अखेर ६५१ अब्ज डॉलर्सच्या उच्चांकी पातळीला पोहोचल्याची माहिती गव्हर्नर यांनी आज दिली.

**<><><><><>**

मतमोजणीच्या दिवशी झालेली भरमसाठ घसरगुंडी भरुन काढत देशातल्या शेअर बाजारांनी आज पुन्हा विक्रमी पातळी गाठली. राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडून झालेला सरकार स्थापनेचा दावा, रिझर्व्ह बँकेचा पतधोरण आढावा यासारख्या कारणांमुळं देशातल्या शेअर बाजारात आज तेजी होती. अवघ्या ३ सत्रांमध्ये सेन्सेक्सनं साडे ४ हजार अंकांहून अधिक तेजी कमावली. एवढ्या कमी

कालावधीत एवढी मोठी तेजी नोंदवण्याचाही हा विक्रम आहे. दिवसअखेर सेन्सेक्स १ हजार ६१९ अंकांनी वधारून ७६ हजार ६९३ अंकांवर बंद झाला. निफ्टी ४६९ अंकांची तेजी नोंदवून २३ हजार २९० अंकांवर स्थिरावला. दोन्ही निर्देशांकांची ही ऐतिहासिक उच्चांकी पातळी आहे. बँक निफ्टी मात्र त्याच्या विक्रमी पातळीपासून अजून दूर आहे.

**<><><><><>**

अठरावा MIFF अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव येत्या १५ ते २१ जून दरम्यान होणार आहे. या महोत्सवात ५९ देशांचे ३१४ चित्रपट प्रदर्शित केले जातील. "अमृतकाळातला भारत" ही, या महोत्सवाची विशेष संकल्पना आहे, अशी माहिती माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी दिली. नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**व्हाइस कास्ट**

*मुख्य चित्रपट महोत्सव मुंबईत होणार असला तरी पुण्यासह दिल्ली, चेन्नई, आणि कोलकातामध्ये चित्रपटांचं प्रदर्शन केलं जाईल. पंधरा जूनला मुंबई, दिल्ली, कोलकाता, पुणे आणि चेन्नई इथं "बिली अँड मॉली, अँड ऑटर लव्ह स्टोरी" या चित्रपटानं महोत्सवाची सुरुवात होईल. या महोत्सवात जपान, रशियन, बेलारूस, इराण, इटली, व्हिएतनाम आणि माली या देशांचे एकूण सतरा चित्रपट दाखवले जातील. यावर्षीच्या महोत्सवात स्पर्धा विभागासाठी ३८ देशांमधून आलेल्या ६५ भाषांमधल्या १ हजार १८ चित्रपटांच्या एवढ्या विक्रमी संख्येनं प्रवेशिका आल्या होत्या. यावर्षी अतिशय उच्च दर्जाचं चित्रपट सादरीकरण प्राप्त झाल्यानं निवड करणं कठीण झालं, असं मत परीक्षक समितीनं व्यक्त केलं आहे. चित्रपटांशिवाय या*

*महोत्सवात संतोष सिवन, ॲड्रिअस स्टोनीस, केतन मेहता, रिची मेहता, यासारख्या अनेक दिग्गजांचे परिसंवाद होणार आहेत.*

**<><><><><>**

दक्षिण आफ्रिकेत सर्व पक्षांचं मिळून राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यात येईल असं सत्ताधारी आफ्रिकन नॅशनल काँग्रेसनं जाहीर केलं आहे. राष्ट्राध्यक्ष सेरिल रामाफोसा यांनी सांगितलं की सर्व मतदारांचं प्रतिनिधित्व करणारं हे सरकार असेल. वर्णद्वेष विरोधी लढ्याचे नेते नेल्सन मंडेला यांच्या आफ्रिकन नॅशनल काँग्रेसनं ३० वर्षात प्रथमच बहुमत गमावलं आहे. गेल्या २९ मे रोजी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत या पक्षाला ४०० पैकी १५९ जागा मिळाल्या.

**//<><><><><>//**